**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 823/2010**

श्री शैलेश दे. निनावे
के.ऑफ श्री जी.आर.सोरते
मु. पो. रोहना ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग
व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय
3 चर्च रोड पुणे 411001
2) श्री डी. बी. साळूंके
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
राज्य मागासवर्ग आयोग पुणे
नविन प्रशासकिय इमारत विधानभवनासमोर पुर्ण 1 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी राज्य मागासवर्ग आयोग पुणे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी समाज कल्याण संचालनालय विभाग पूणे यांचेकडे हलबा कोष्टी 1965 च्या अहवालात साडेबारा उपजाती कशाच्या आधारे तयार केल्या. त्याची मुळ आधाराची प्रमाणित प्रत पुरविण्याबाबत. तसेच निर्णयाच्या आदेशानुसार त्या अधिका–याचे नाव, पदनाम, आदेशाच्या प्रती इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जदार बी.पी. एल.प्रमाणपत्र धारक आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.2.2010 रोजी उपसंचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय यांनी संशोधन अधिकारी राज्य मागासवर्ग आयोग यांचेकडे अपीलकर्ता यांचा अर्ज हस्तांतर करुन अर्जदारास परस्पर माहिती पुरविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे दिनांक 9.2.2010 रोजी संशोधन अधिकारी राज्य मागासवर्ग आयोग यांनी अपीलकर्ता यांना आयोगाचे कार्यालय सन 1995 पासून कार्यान्वीत झाल्याने संदर्भिय अर्जान्वये आपण मागणी केलेली हलबा कोष्टी जाती संबंधीची सन 1965 च्या अहवालाची माहिती आयोगाचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. याबाबत आपण परस्पर शासनाशी संपर्क साधावा अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.2.2010 रोजी प्रथम अपील उपसंचालक समाज

कल्याण संचालनालय यांचेकडे दाखल केले. परंतू पुन्हा दि. 20.3.2010 रोजी सहसंचालक शिक्षण समाज कल्याण संचालनालय यांनी श्री एल.एस.माळी संचालक विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय यांचेकडे प्रथम अपील हस्तांतर केलेले आहे. व त्याबाबतची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतू त्यानंतर त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले 1965 मध्ये हलबा कोष्टीच्या संदर्भात अहवाल तयार करण्यात आला तो समाज कल्याण संचालनालयकडे तयार करण्यात आला. व त्यामुळे त्यांनी माहिती अधिकारी म्हणून कार्यालयातील संशोधन अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली होती. राज्य मागासवर्ग आयोग हे 1995 पासून कार्यरत असल्यामुळे त्यांचेकडे ही माहिती असणार नाही याबद्यलची त्यांना कल्पना होती. व त्यामुळेच त्यांनी समाज कल्याण संचालनालयकडे माहिती मागितलेली होती. परंतू त्यांच्या अर्जात काय माहिती मागितली आहे याचे कोणत्याही प्रकारचे आकलन करुन न घेता अर्जाचे हस्तांतर राज्य मागासवर्ग आयोगाकडे केले. व राज्य मागासवर्ग आयोगानी त्याची स्थापना मुळात सन 1995 मध्ये झाली असे कळवून माहिती शासनाकडून घ्यावी असे कळविले. प्रथम अपील सुध्दा त्यांनी संबंधित संचालनालयकडेच दाखल केले होते परंतू त्यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल न घेता व आकलन न करता सदरचे अपील हे हस्तांतर केले. व नंतरच्या प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तर त्या अपीलाची दखल घेण्याची सुध्दा तसदी घेतलेली नाही. त्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांना कोणत्या कार्यालयाकडून मिळू शकेल याबद्यलचा मुळ प्रश्न कायम आहे. शासकीय कार्यालयामध्ये मुळ विषयाचा अभ्यास न करता टोलवाटोलवी कसा होतो याचा हा उत्तम नमुना आहे.

4. राज्य मागासवर्ग आयोगाचे माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यानी 1965 चा अहवाल समाज कल्याण संचालनालयानेच केला होता व त्यामुळे त्यांचेकडे अहवाल कशाच्या आधारावर करण्यात आला होता. याबाबतची कागदपत्राची कोणतीही माहिती उपलब्ध असणे शक्य नाही. किंवा तसे त्यांचेकडे कागदपत्राचे हस्तांतर पण करण्यात आलेले नाही. वास्तविक ही बाब समाज कल्याण संचालनालयाच्या अधिका–यांना माहिती असणे आवश्यक होती. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील हस्तांतर केले आहे. ते कोणत्याही प्रकारचा विचार न करता हस्तांतर केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता मात्र माहिती पासून वंचित आहे. त्याकरीता मुळ शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी किंवा उपसंचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे–1 हे जबाबदार दिसून येतात. व त्यांनी योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दोषी आढळुन येतात. अपीलकर्ता यांना सुध्दा जन माहिती अधिकारी म्हणून राज्य मागासवर्ग आयोग असे द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केलेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगाचे कार्यालयाने दि. 15.6.2010 रोजी त्यांनीच नोटिस काढलेली आहे. व मुळ ज्यांचेकडे अर्ज केला होता हे शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी समाज कल्याण संचालनालय यांना नोटिस काढण्यात आली नव्हती. परंतू सुनावणीअंती माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी समाज कल्याण संचालनालय विभाग पूणे यांनीच माहिती अधिकारी म्हणून माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू ते आज हजर नाहीत. त्यांना नोटिस नाही व त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आलेले नाही. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याकरीता त्यांचेविरुध्द शास्ती का लादण्यात येवू नये किंवा याबाबत त्यांनी आयोगाकडे खुलासा करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत शासकीय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी किंवा उपसंचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे–1 यांनी विनामुल्य रजिस्टर पोष्टानी माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे–1 यांनी माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन न देता अर्जाचे हस्तांतर केले. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी शासकीय माहिती अधिकारी तथा उपसंचालक (नाहसं) समाज कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पूणे–1 यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.722-724

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 821/2010**

श्री सुरेंद्र पुंडलिकराव रेवतकर
प्लॉट नं. 345 हनुमान मंदिर जवळ
आय.यु.डी.पी.काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस महासंचालक कार्यालय
पोलीस मुख्यालय मुंबई
2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस महासंचालक कार्यालय
पोलीस मुख्यालय मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी तथा उपसहा. पोलीस महानिरीक्षक तथा गोपनिय पोलीस महासंचालक मुंबई हे गैरहजर आहे. परंतू त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री भाऊसाहेब निकम कक्ष अधिकारी तथा सहा. माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.4.2010 रोजी त्यांनी दि. 18.5.2009, 4.2.2010 व 4.2.2010 ला केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये कार्यवाहीचे दस्तऐवज मिळण्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी दि. 31.7.2007 ते 6.4.2010 पर्यंत आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.5.2010 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपसहा. पोलीस महानिरीक्षक (गोपनिय) (अतिरिक्त कार्यभार) पोलीस महासंचालक यांचे कार्यालय यांनी पोलीस आयुक्त नागपूर शहर व अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) म. रा. मुंबई यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांचे कार्यालयाकडे अहवाल मागविण्यात आला असता पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. सदरचे प्रकरण वरिष्ठांकडे सादर केले असुन निर्णयाधीन आहे असे कळविलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.5.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी न घेता अपीलकर्ता यांना त्यांच्या मुळ अर्जास अनुसरुन शासकीय माहिती अधिकारी तथा उपसहा. पोलीस महानिरीक्षक (गोपनिय) यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भ क्र. 2 अन्वये आपणास दिलेले उत्तर योग्य आहे अशी आमची पूर्ण खात्री झालेली आहे व त्यामुळे प्रथम अपील निकाली काढलेले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की दि. 6.5.2010 रोजी सदरचे प्रकरण वरिष्ठांकडे सादर केले असून निर्णयाधीन आहे असे जरी कळविलेले असले तरी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे किंवा आज द्वितीय अपीलाच्या सुनावणी पर्यंत त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही हा माहिती उपलब्ध करुन न देण्याचाच एक भाग आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी सहा. माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की जोपर्यंत वरिष्ठांचा निर्णय होत नाही तोपर्यंत माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतू अर्ज केल्यानंतर 30 दिवसामध्ये जी वस्तुस्थिती असते त्यांना मुदतीत कळविण्यात आलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे एखाद्या प्रकरणात कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (5) अन्वये किंवा कलम 20 (1) च्या द्वितीय अपील परंतूकाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. अधिनियमामध्ये सहा. माहिती अधिकारी यांना अपील किंवा तक्रारी स्वीकारुन त्या जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करणे एवढेच कर्तव्य दिलेले आहे. व त्यामुळे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी हजर राहणे आवश्यक असल्यामुळे व ते हजर राहिलेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. व ती पोलीस महासंचालक यांनी करणे संयुक्तिक राहिल. परंतू माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक म.रा. मुंबई महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा मुंबई 400001 यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.725-726

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>निवड नस्ती</u>

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 819/2010

श्री दिवाकर माणिकराव इंगोले
श्रचना घरकुल अपार्टमेंट प्लॉट नं. 114
रामनगर नागपूर
ता. जि. नागपूर 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक
(आस्थापना शाखा) पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई
2) जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक
(आस्थापना–1) पोलीस महासंचालक कार्यालय मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 13.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना–1) हे गैरहजर असून त्यांनी प्रतिनिधी म्हणून सहा. माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री बा. स. निकम यांना पाठविण्यात आलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना–1) यांचेकडे पदोन्नतीची मानीव तारीख 19.1.2003, 19.11.2005 व 2.2.2010 चा अर्ज पोलीस प्रशिक्षण विद्यालय नागपूर यांचे पृष्ठांकन क्र. पोप्राविना/आस्था–1/524/10 दि. 6.2.2010 रोजीची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 20.5.2010 रोजी प्रथम अपील हे पोलीस उपमहानिरीक्षक (आस्थापना शाखा) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतू प्रथम अपीलाची सुनावणी न घेता दि. 8.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने अंतरीम उत्तर दिले आहे. परंतू त्यापूर्वीच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही व सुनावणी घेतली नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माझा अर्ज दि. 6.3.2010 रोजी दिला व त्यात त्यांनी दि. 9.10.2003, 19.11.2005 व 2.2.2010 च्या अर्जावर काय कार्यवाही केली अशी माहिती विचारली. परंतू त्यांना 30 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच केलेली आहे व अर्जाची दखल सुध्दा घेतलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व सुनावणी सुध्दा घेतलेली नाही. मात्र दि. 8.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना–1) पोलीस महासंचालक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयात अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सुध्दा समाधानकारक नाही. माहितीचा अर्ज केल्यानंतर व प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांच्या मुळ अर्जाची दखल घेण्यात आलेली दिसून येते. व त्यानंतरच ई.सी. बी. कार्यालयास विचारणा करण्यात आलेली आहे. याचा अर्थ त्यांच्या संपूर्ण अर्जाच्या संदर्भात कार्यवाही तर केली नाहीच पण माहिती सुध्दा देण्याची टाळाटाळ केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती का दिली नाही याबद्यल अधिनियमाच्या कलम 19 (5) अन्वये आयोगापुढे सांगणे आवश्यक आहे. व माहिती दिली नसल्यास शास्ती का करण्यात येवू नये याबद्यलचा सुध्दा खुलासा त्यांनी आयोगापुढे कलम 20 (1) च्या द्वितीय अपील परंतूकाप्रमाणे राज्य जन माहिती अधिका–याची आहे. व त्यामुळे त्यांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतू त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला आहे. व त्यांना त्याबाबत कोणतीही माहिती आहे असे दिसून आलेले नाही. व माहिती का उपलब्ध करुन देण्यात आली नाही याबद्यल ते समाधानकारक खुलासा करु शकले नाही. सहाय्यक माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अर्ज स्वीकारणे व संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करणे याशिवाय कोणतेही कर्तव्य नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन जी देण्याची टाळाटाळ केलेली आहे व 90 दिवसानंतर माहितीच्या अर्जाचे उत्तर दिलेले आहे त्यामुळे ते अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये दोषी आढळुन येतात. व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपीलाची दखल घेतलेली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. ती पोलीस महासंचालक यांनी करावयाची आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 9.10.2003, 19.11.2005 व 2.2.2010 च्या अर्जावर काय कार्यवाही झाली याबद्यलची कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपसहायक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना–1) यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 6.3.2010 च्या अर्जात मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या कलम 7 (1) अन्वये 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात आली नाही म्हणून दोषी आढळुन येतात. व त्यांचेविरुध्द शास्ती का लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द रु. 25000/– ची शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.727-729

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>निवड नस्ती</u>

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 834/2010**

श्री रमेश सदाशिवराव उरकुडे
अव्वल कारकुन जमीन शाखा
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर विभाग नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
2) श्री सी. पी. सीरसान
जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.6.200 रोजी नोटीस काढून दि. 14.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी महसूल शाखा विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडे अव्वल कारकूनांना ना.त.संवर्गात पदोन्नती देण्याबाबत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर कडून पदोन्नत ना.त.यांचे पदस्थापनेस मान्यतेकरीता शासनास क्र.मशा 6(1)/आस्था 1/सीआर 162/2005 दि. 21 एप्रिल 2007 सोबत सादर केलेल्या यादीस शासन स्तरावरुन मिळालेल्या मान्यतेस अनुसरुन आपले कार्यालयान आदेश क्र. मशा 6(1)/सीआर 162/2005 दि. 11.6.2007 चे आदेशान्वये निर्गमित आदेशाची प्रत. प्राप्त आदेश अर्जाची प्रत व सदर आक्षेप प्राप्त झाल्याचा दिनांक. आक्षेपास अनुसरुन माझे ना.त. संवर्गात शासन मंजुरीस अनुसरुन पदोन्नती संबंधी आयुक्त कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची प्रत. त्यानंतर दि. 19.7.2007, 26.7.2007, 27.11.2007, 21.2.2008 व 6.6.2009 रोजी सादर अर्जास केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती. ना.त. संवर्गात पदोन्नती देण्याबाबत शासन स्तरावरील दि.7.3.2007 अन्वये दिलेली मंजुरी शासनाने रद्य

केली असल्यास सदर आदेशाची प्रत. वर नमुद केलेल्या अर्जास अनुसरुन केलेली कार्वाही अर्जदारास कळविली असल्यास त्यासंबंधी पत्र प्रत व पोच अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनूषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपील हे मंजूर करण्यात आले असून अपीलार्थी यांना विनामुल्य माहिती 2 दिवसात द्यावी संबंधीत नस्ती ही वेळेवर उपस्थित झाली नाही हे कारण संयुक्तिक वाटत नाही. या करीता संबंधित लिपीक यांना समज देण्यावी शिफारस करण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 29.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की गेल्या 3 वर्षा पासून त्यांच्या पदोन्नतीचे प्रकरण हे विनाकारण प्रलंबित आहे. पदोन्नतीचे प्रकरण सुरु असतांना आदेश काढण्यास स्थगिती देण्यात आली त्या संदर्भात आलेल्या आक्षेपांचा दिनांक त्यांनी मागितला परंतू तो दिला नाही. इतर माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू ती विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सद्या त्यांच्या प्रकरणाला स्थगिती दिली असल्यामुळे कोणतेही आदेश काढण्यात आले नाही व शासनाकडे प्रकरण पाठविण्यात आले नाही. माहिती विलंबाने दिली या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निष्कर्ष काढून संबंधित लिपीकास जबाबदार धरण्यात आलेले आहे व त्यामुळे संबंधित लिपीक हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यास जबाबदार आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्या करीता कर्मचारी किंवा अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे लागते व तसे ते सहाय्य घेणे अधिनियमाच्या कलम 5 (4) प्रमाणे संयुक्तिक आहे. व लिपीक यांचेकडून ते सहाय्य घेण्यात आलेले आहे. परंतू लिपीक यांनी नस्ती उपलब्ध झाली नाही असे कारण दिले आहे. व अशा सहाय्य घेतलेल्या कर्मचा–यास अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यामुळे संबंधित लिपीकास जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व ते विलंबास जबाबदार असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामध्ये आक्षेप घेणारे पत्र कोणत्या तारखेस प्राप्त झाले ते दिले नाही व त्यामुळे संबंधित लिपीक हे जबाबदार आहे असा निष्कर्ष काढण्यात आलेला असल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 29.3.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यास लिपीक जबाबदार आहे असा निष्कर्ष प्रथम अपीलीय अधिकारी यांनीच काढलेला असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 5 (4) व (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 1000/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहााचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी. 2) अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. 2 च्या संदर्भात आक्षेप अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावा. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**<br>
Ageyord6.731-733

जा.क्र.--------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>निवड नस्ती</u>

उपसचिव<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 836/2010

कु. सुलोचना गोविंदराव नासरे
मु. पो. मोवाड वार्ड नं. 16 घर नं. 55
को.–ऑपरेटिव्ह बॅंकेजवळ
ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बा. ह. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 14.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. शिक्षणाधिकारी गैरहजर आहेत. व त्यांनी कार्यालयात कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे सादर केलेले नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे जनता क. महाविद्यालय खैरगाव यांच्या संदर्भातील संस्थेच्या दि. 15.7.2005 च्या मुख्याध्यापकांच्या प्रस्तावातील दस्तऐवज व अशाप्रकारे एकुण 14 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी जा माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात त्यांना माहिती सुध्दा दिली नाही व कोणताही पत्रव्यवहार केला नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले परंतू जन माहिती अधिकारी हजर झाले नसल्यामुळे निर्णय देण्यात आलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही व प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नसल्यामुळे त्यांनी माहिती

उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व ते अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येतात. आज नोटिस काढून त्यांना संधी देण्यात आली होती परंतू ते हजर झाले नाही व कोणताही खुलासा दाखल केला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी हे त्याबाबत काहीही सांगू शकले नाही. व त्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 10.2.2010 च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्येनिहाय माहिती उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 10.2.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा जन माहिती अधिकारी हे हजर झाले नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची रु. 5000/- ची वसुली ही त्यांचे दरमहााचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी. सदरची कार्यवाही ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर** यांनी करावयाची आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.735-736

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

निवड नस्ती

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 850/2010 व नाग 851/2010

श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर
रामनगर वार्ड नं. 20 पोटेगाव रोड
गडचिरोली ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एम. पुराम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री के. बी. गुंफावार
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 15.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 850/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 31.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे गौण खनिजाची रॉयल्टी बाबत सन 2006–07 व 2007–08 जिल्हाधिकारी गडचिरोली करीता 130/10/खनिकर्म विभाग/गड.चे पत्रानुसार क्र.1188/गौण खनिजाची रक्कम 54715/– चा भरणा केलेल्याची डी.डी.क्रमांक व दिनांक आणि रक्कम बाबतच्या सत्यप्रती. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.6.2010 व 28.6.2010 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की जिल्हाधिकारी यांचे पत्र आहे व त्या पत्राप्रमाणे कार्यवाही झाली किंवा नाही ही माहिती त्यांनी विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ती माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे लेखा व बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने सदर माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री ए. बी. चव्हाण शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली व श्री एन.डी.मेश्राम सहाय्यक लेखा अधिकारी आणि श्री व्ही.बी.ब्राम्हणवाडे सहाय्यक आरेखक पंचायत समिती गडचिरोली यांना दि. 3.4.2010, 15.4.2010, 21.4.2010 व 26.4.2010 च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले होते. श्री व्ही.बी.ब्राम्हणवाडे सहाय्यक आरेखक यांनी त्यांचे पत्र दि. 15.4.2010 अन्वये गौण खनिजाची भरणा केलेली रकमेबाबत संबंधित शाखा अभियंता यांचेकडे संपूर्ण दस्तऐवज असल्यामुळे आवश्यक माहिती संबंधिताकडून उपलब्ध करुन असे कळविले. मात्र श्री ए. बी. चव्हाण शाखा अभियंता व श्री एन.डी.मेश्राम सहाय्यक लेखा अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारचे पत्र किंवा माहिती मुदतीचे आत कार्यालयात प्राप्त झाले नाही व त्यामुळे संबंधितास विहित मुदतीत माहिती देता आली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 1.6.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यांनी सुनावणी घेतलेली नाही. व श्री ए. बी. चव्हाण व श्री एन.डी.मेश्राम यांना सुनावणीचे तारखेस उपस्थित राहावे असे कळविण्यात आले. त्यानंतर पुन्हा दि. 28.6.2010 रोजी निर्णय देवून सहाय्यक लेखा अधिकारी यांचे पत्र दि. 17.6.2010 अन्वये माहिती बाबत दस्तऐवजावरुन तपासणी केली असता सदर माहिती लेख विभागात उपलब्ध नाही असे कळविले. परंतू श्री ए. बी. चव्हाण हे उपस्थित होते व त्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे आदेश पारीत केलेले दिसून येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो

4. जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून माहिती मागितलेली असली तरी त्यांचेकडे माहिती उपलब्ध नसल्यास माहिती पुरविण्याकरीता त्यांना अधिनियमाचे कलम 5 (4) प्रमाणे इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांचेकडे माहिती उपलब्ध असेल त्यांचे सहाय्य घेता येते. व अशा प्रकारे त्यांनी सहाय्य घेतल्यास त्या अधिका–यास किंवा कर्मचा–यास अधिनियमाचे कलम 5 (5) अन्वये जन माहिती अधिकारी समजण्यात येते. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी पंचायत समिती यांनी शाखा अभियंता श्री ए. बी. चव्हाण व श्री एन.डी.मेश्राम सहाय्यक लेखा अधिकारी यांचे माहिती उपलब्ध करुन देण्या करीता सहाय्य घेतले होते. परंतू त्यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व श्री ए. बी. चव्हाण यांनी शाखा अभियंता म्हणून आतापर्यंत प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते माहिती अधिकारी म्हणून दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द

अधिनियमाचे कलम 20 (1) प्रमाणे श्री ए. बी. चव्हाण शाखा अभियंता यांचे विरुध्द रु. 5000/– व श्री एन.डी.मेश्राम सहाय्यक लेखा अधिकारी यांचे विरुध्द रु. 1000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. नाग 851/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे 12व्या वित्त आयोगातील पं.स. स्तरावरील सन 2006–07 व 2008 कामावरील मजुराचे हजेरीपट बाबत शाखा अभियंता अरविंद चौव्हाण यांनी कार्यारंभ आदेश क्र. 27, 1990, 40, 778, 1150, 728 अन्वये सन 2006–07 व 07–2008पर्यंत 12 व्या वित्त आयोगांतर्गत प.स.स्तर पुर्ण केलेल्या कामावरील मजुराचे हजेरीपटाची सत्यप्रत स्वतः उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 28.6.2010 रोजी देण्यात आलेला आहे. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

6. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 29.3.2010 च्या अर्जान्वये मागितलेली माहिती ही श्री ए. बी. चव्हाण शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे त्यांना दि. 3.4.2010, 15.4. 2010, 21.4.2010 व 26.4.2010 पत्रे दिली व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले. परंतू त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 1.6.2010 रोजी ठेवण्यात आली होती परंतू जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री ए. बी. चव्हाण यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 7.7.2010 रोजी श्री ए. बी. चव्हाण यांनी संपूर्ण आयोगाची पाहणीअंती अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती माझ्याकडे उपलब्ध नसल्याने सदर माहिती मी पुरविण्यास असमर्थ आहे व सदरील माहिती ही माझ्याशी निगडीत नाही असे कळविलेले आहे. आता यापूढे प्रश्न उपस्थित होतो की जन माहिती अधिकारी यांनी पत्र दिल्यावर श्री चव्हाण यांनी विहित मुदतीत त्यांचेकडे माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे कळविणे आवश्यक होते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस श्री चव्हाण हजर होते. त्यावेळेस त्यांनी त्यांचे पत्र क्रमांक निरंक दि. 19.6.2010 अन्वये राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडील अपील क्र. 603 दि. 17.9.2006 ला दिलेल्या निर्णयानुसार 12 व्या वित्त आयोग सन 2006–07 व 08 शी संबंधि संपूर्ण दस्तऐवज सदरील अपीलकर्त्यापुढे ठेवून त्यांना हवे असलेले सर्व रेकॉर्ड 4–5 वर्षे जुने असल्याने व मागितलेल्या माहितीचे रेकॉर्ड माझ्याशी संबंधित आहे किंवा कसे याची जाणीव करुन घेणे नितांत गरजेचे आहे. सद्या माझ्याकडे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना 12 वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर

मधील सुरु बांधकामातील मजुरांचे पेमेंट व मस्टर बंद करावयाचे अत्यंत महत्वपूर्ण काम सुरु असल्याने सदर अपील क्र. 10 मध्ये वेळ देण्यात यावे जेणेकरुन माहिती बाबत माहिती शोधून देणे सोयीचे होईल व त्याप्रमाणे वर नमुद केल्याप्रमाणे दि. 7.7.2010 त्यांचेकडे माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते.

7. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती ही कोणत्या अधिकारी कर्मचारी यांचेकडे आहे याचा शोध घेवून त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व जबाबदारी निश्चित केल्यानंतर संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. मात्र श्री ए. बी. चव्हाण शाखा अभियंता यांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. 3.4.2010 च्या पत्राप्रमाणे सुरुवातीला कळविले असते तर पुढे शाखा अभियंता ए. बी. चव्हाण हे तसेही दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 1000/- ची शास्ती लादण्यात येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. नाग 850/2010 हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता शाखा अभियंता ए. बी. चव्हाण व श्री एन.डी.मेश्राम सहाय्यक लेखा अधिकारी यांचे सहाय्य घेतलेले असल्यामुळे व त्यांनी विहित मुदतीत काहीही कळविलेले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही त्यामुळे अधिनियमाचे कलम 5 (4) व (5) प्रमाणे त्यांना माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (1) अन्वये अनुक्रमे रु. 5000/- व रु. 1000/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) अपील क्र. नाग 851/2010 हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांना त्यांच्या दि. 3.4.2010 च्या पत्राप्रमाणे शाखा अभियंता ए. बी. चव्हाण यांनी विहित मुदतीत काहीही कळविलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नसल्यामुळे किंवा जन माहिती अधिकारी यांना अन्य अधिका-याकडून चौकशी करता आली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम 20 (1) अन्वये शाखा अभियंता ए. बी. चव्हाण यांना रु. 1000/- ची शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरची शास्तीची वसुली ही खंड विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांनी करावयाची आहे. सदरची शास्ती ही मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कळविलेली नसल्यामुळे लादण्यात आलेली आहे याबाबतची नोंद घ्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.738-742

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

निवड नस्ती

उपसचिव
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 871/2010 व अपील कमांक नाग 872/2010**

श्री बंडुभाऊ देवाजी चौरागडे
मु. पो. खापरखेडा वार्ड क.2
श्याम मंगल कार्यालया जवळ
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**अपील कमांक नाग 871/2010**

1) श्री एन. व्ही. बुटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर

2) श्री एफ. टी. पिसे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत कार्यालय पिपळा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**अपील कमांक नाग 872/2010**

3) श्री एन. व्ही. बुटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर

4) श्री राजेंद्र मोंढे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत कार्यालय पाटणसावंगी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 16.7.2010 )

नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 871/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 23.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पिपळा यांचेकडे तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पाटणसावंगी यांचेकडे ग्रामपंचायतच्या संबंधित विस्तारपुर्वक बारावा वित्त आयोग योजने अंतर्गत, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरंटि योजने अंतर्गत, यशवंत ग्राम समृध्दी योजने अंतर्गत, भारत निर्माण योजने अंतर्गत ग्रामपंचायतला आजपर्यंत एकुण किती रक्कम प्राप्त झाली आहे? कोणत्या कामावर खर्च करण्यात आला आहे व शिल्लक रक्कम किती आहे? यासंबंधी सत्यप्रत. सदरची माहिती रजिस्टर टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पिपळा यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू ठरावीक मुदतीत माहिती न दिल्यामुळे व अपुर्ण माहिती दिल्यामुळे दि. 12.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये श्री एफ.टी.पिसे ग्राम विकास अधिकारी यांनी दि. 23.3.2010 रोजी रजिस्टर पोष्टाद्वारे मुद्येनिहाय माहिती सादर केली व दिलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत व पाष्टाची रजिस्टर केलेली पावती ही प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सादर केली व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतू अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता आज हजर नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा गैरहजर होता व जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे पुरावे सादर केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. नाग 872/2010 मध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी त्यांचा अर्ज हा शिला काकडे सफाई कामगार यांचेकडे दिला होता परंतू तो त्यांना प्राप्त झाला नाही. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. दूरध्वनीवरुवरुन त्यांनी असे सांगितले की विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले. परंतू त्यांना अर्ज प्राप्त झालेला नाही. अर्ज दिल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता

येईल असे सांगितल्यावर अपीलकर्ता यांनी त्यांना दि. 15.6.2010 रोजी अर्जाची प्रत दिली व त्याप्रमाणे दि. 16.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक 24.5.2010 रोजी ठेवण्यात आली होती. परंतू प्रथम अपीलाच्या सुनावणीस अर्जदार व ग्राम विकास अधिकारी दोघेही हजर नसल्यामुळे निर्णय देता आलेला नाही. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांचा माहितीचा अर्ज हा सफाई कामगार यांचेकडे दिलेला असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत नाही व तशीही त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. नाग 871/2010 व अपील क्र. नाग 872/2010 ही अपीले खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.744-746

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 869/2010 व अपील क्रमांक नाग 870/2010**

श्री गोपीनाथ क. भगत
53 जयभिम को.–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी
चंद्रमणी नगर नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक नाग 869/2010</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री टी. पी. राठोड
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक क्र.2
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक नाग 870/2010</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी
राज्य कामगार विमा योजना विदर्भ विभाग नागपूर
इमामवाडा नागपूर 3
2) श्री ए. एम. श्रीखंडे
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
राज्य कामगार विमा योजना विदर्भ विभाग नागपूर
इमामवाडा नागपूर 3 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 869/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे 15 नोव्हेंबर 2007 ते 10 आक्टो. 2008 100 गाळे अल्प उत्पन्न गटा पैकी किती गाळे वैध व किती गाळे अवैध ठरविण्यात आले यांची यादी मिळण्याबाबत. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.3.2010 रोजी सदर योजनेतील प्राप्त अर्जावर प्राधिकृत अधिका–या मार्फत अर्ज छाननीची प्रक्रिया सुरु असून त्यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 5.5.2010 रोजी सदर प्राधिकरण प्राधिकृत अधिका–या मार्फत चौकशी सुरु असल्याने सदरची माहिती सद्या उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे बरोबर असल्याने अपील खारीज करण्यात आले. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माहिती मागितली परंतू अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की चौकशी सुरु आहे परतू दरम्यान चौकशी अधिकारी यांची बदली झाली असल्यामुळे व गाळे धारकाचे बयाण घेणे असल्यामुळे चौकशीचे कामकाज लाबलेले आहे. चौकशी पूर्ण झाल्यावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 870/2010 मध्ये दि. 19.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी राज्य कामगार विमा योजना विदर्भ विभाग नागपूर यांचेकडे दि. 3.3.1993 ला शासन सेवेत कोणत्या नियमात घेतल्याबाबतची माहिती वय 43 वर्ष 8 महिने 2 दिवस वयाधिक असतांना सेवेत घेण्याबाबत. दि. 15.4.2010 रोजी माहिती घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 4.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यात माहिती मिळाली नाही मुद्दा क्र. 3 ची माहिती अजुनही असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देताना काय माहिती मागितलेली आहे याबाबत कोणतेही आकलन करुन न घेता उत्तर दिलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील कर्मचारी यांनी अपीलकर्ता यांची नस्ती उपलब्ध आहे असे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या नस्तीचे निरीक्षण करुन देणे व त्यातून त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतू जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे बुध्दीचा वापर न करता उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपील क्र. नाग 869/2010 खारीज करण्यात येते.
2) अपील क्र. नाग 870/2010 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिवसाचे तारीख व वेळ लेखी कळवून त्यांचेकडे उपस्थित होवून सदरच्या नस्तीचे निरीक्षण करावे व त्यातून त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असल्यास त्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदरची नस्ती निरीक्षणास उपलब्ध करुन द्यावी व त्यातून आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
3) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिशाभूल करणारे उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर
Ageyord6.748-750

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>निवड नस्ती</u>

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 874/2010**

श्री गजेंद्र रामाजी मानकर
द्वारा जिल्हा आरोग्य विभाग
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. के. मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री रामचंद्र ओझा
जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी यांचेकडे दि. 29.12.95 ला आपल्या प्रा.आ.केंद्रात रुजू होते वेळेसचे वैयक्तीक नस्ती अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 20.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5.4.2010 रोजी सुनावणीस माहिती अधिकारी अपीलकर्ता हजर झाले नाही. व त्यामुळे निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी येथे उपलब्ध नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचे सेवा पुस्तक उपलब्ध आहे व सेवा पुस्तकात

त्यांची सर्व माहिती दिली आहे. त्यामुळे सेवा पुस्तकावरुन त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घेता येईल. परंतू पुन्हा त्यांनी असेही सांगितले की त्यांच्या कार्यालयातून प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी सदरचे नस्तीचे त्यांचे कार्यालयात पुन्हा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न ते स्वतः करण्यास तयार आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयामध्ये त्यांच्या नस्तीचा शोध घेवून माहिती उपलब्ध झाल्यास पुरविण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.747-748

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 873/2010**

श्रीमती प्रिती शंकरराव मसारकर
संत्रा मार्केट रोड कुंभारपुरा रेल्वे स्टेशन जवळ
साईनाथ अपार्टमेंटच्या मागे नागपूर 18 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. वाय. टेंभरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (संचलन)
महा. राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित
उद्योग भवन 3रा माळा सिव्हील लाईन्स नागपूर
2) श्री प्रशांत ढागरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी
महा. राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित
उद्योग भवन 3रा माळा सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी महा. राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित उद्योग भवन 3रा माळा नागपूर यांचेकडे कनिष्ठ लघुलेखक या पदावर निवड झाल्यानंतर सुध्दा नियुक्ती आदेश न देण्याबाबत शासनाचे/ महामंडळचे आदेश असल्याची प्रत. माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री स. वि. उबाळे यांनी आपण अतिरिक्त मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही अशा प्रकारे उत्तर दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 15.6.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी महामंडळाद्वारे विविध रिक्त पदासाठी निवड केलेल्या उमेदवाराची वैध्णता मुदत निवड केल्याच्या तारखेपासुन 1 वर्षाच्या कालावधीकरीता आहे. सदर कालावधीत कार्यालय व खाणीवरील पदाच्या आवश्यकतेनुसार रिक्त पदे भरण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना कोणत्याही प्रकारची निश्चित माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती दिली. परंतू विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की कनिष्ठ लघुलेखक यांची भरती ही ज्या अधिका–याकरीता करण्यात आली होती त्या पदावर नियुक्ती न झाल्यामुळे त्यांना नियुक्ती देण्यात

आली नाही. व त्यामुळे ती प्रतिक्षा यादी धरण्यात आली व प्रतिक्षा यादीवर 1 वर्षाचा कालावधी असतो व त्यानंतर ती प्रतिक्षा यादी नियमानुसार वयपगत होते. 1 वर्षाच्या कालावधीमध्ये संबंधित अधिका–याची नियुक्ती न झाल्यामुळे कनिष्ठ लघुलेखक यांनासुध्दा नियुक्ती देण्यात आली नाही असे त्यांना दि. 15.6.2010 रोजी कळविण्यात आले आहे. परंतू हीच माहिती जर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत 30 दिवसात कळविली असती तर अपीलकर्ता यांना अपीले करण्याची आवश्यकता राहिली नसती. शासनाचे पत्र आहे काय असे विचारले असता त्याचा आशय लक्षात घेवूनच उत्तर देणे संयुक्तिक होते. परंतू योग्य माहिती न देण्याच्या प्रवृत्तीमुळे ती तशी माहिती देण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 15.3. 2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांना अपीले दाखल करावे लागले. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 500/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहााचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी. सदरची वसुलीची जबाबदारी सक्षम अधिकारी यांची राहिल.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.750-751

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>निवड नस्ती</u>

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 884/2010

श्री गंगाधर सुदाम डेकाटे
मु. पो. सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर 441214 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती वसुधा नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय
आदिवासी भवर गिरीपेठ नागपूर
2) श्री आर. आर. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय
आदिवासी भवर गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 26.2.2010 अन्वये अनुसूचित जमाती मधील हलबा जातीच्या एकूण 49 लोकांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेले दिसून येते. त्यांचे पूर्ण नाव, पूर्ण पत्ता, व कोणकोणत्या तारखांना वैधता प्रमाणपत्र दिल्या गेलेले आहेत त्यांची संपूर्ण माहिती द्यावी. अर्जाच्या अनुषंगाने दि. 31.3.2010 रोजी कागदपत्राची संख्या 2 असून एकूण प्रतीस रु. 2/- प्रमाणे 4/- अधिक डाक खर्च रु. 38/- असे एकूण 42/- पाठविल्यास माहिती पाठविला येईल असे कळविलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.4.2010 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आला व असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आत माहितीच्या कागदपत्राकरीता अतिरिक्त खर्च रु. 4/- अधिक डाक खर्च रु. 38/- असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन द्यावी. अर्जाचे सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले नव्हते असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतू आता प्रथम अपीलाच्या सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे ते दि. 5.9.1999 चे आहे. त्यामुळे ते नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.753-754

जा.क्र.---------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 885/2010

श्री पॅंथर यशवंत बळीराम अंबागडे
मु. पो. सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर 441214 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. डी. सहारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(कृषी)
पंचायत समिती उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर
2) श्री आर. एस. खंडार
जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ..2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत सिर्सी दि. 1.4.1999 ते 31.9.2010 या वर्षातील ग्रामपंचायतच्या एकूण उत्पन्नाची माहिती एकुण 5 मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.4.2010 रोजी अतिरिक्त खर्च म्हणून रु. 1676/– भरण्यास कळविण्यात आलेले होते. त्यानंतर दि. दि. 22.4.2010 रोजी अपीलकर्ता यांनी

3. सदरच्या खर्चाच्या संदर्भात खर्च अवाजवी आहे असे त्यांनी आक्षेप घेतलेले दिसून येतात. पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी दि. 26.4.2010 रोजी तपशिलात खर्च कळविलेला दिसून येतो. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 24.5.2010 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेल्या रकमेपैकी मनुष्यबळाकरीता लागणा–या वेळेची नियमात तरतुद नसल्यामुळे लागणा–या वेळेकरीता आकारण्यात आलेला खर्च रु. 600/– मान्य करता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः

मंजुर करण्यात आले असून अपीलकर्ता यांना दि. 11.6.2010 रोजी रु. 1676/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे तसेच मुळातच जो अतिरिक्त खर्च आकारता येत नाही तो आकारल्यामुळे खर्चाचा भरणा करण्यास विलंब झालेला असल्यामुळे व माहिती ही 30 दिवसात उपलब्ध झालेली नसल्यामुळे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे. तो सुरुवातीचा खर्च हा मुदतीतच कळविलेला असल्यामुळे माहितीचा खर्च हा भरणे आवश्यक आहे त्याच वेळेस अपीलकर्ता यांनी माहितीचा खर्च भरणे आवश्यक होते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.756-757

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 883/2010

श्री दयालाल गोरखनाथ नानवटकर
मु. पो. मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्रीराम ग्राम विकास शिक्षण संस्था नागपूर
शैक्षणिक संकुल परिसर मौदा
ता. मौदा जि. नागपूर
2) डॉ. विनोद गावंडे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
श्रीराम ग्राम विकास शिक्षण संस्था नागपूर
शैक्षणिक संकुल परिसर मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा श्रीराम ग्राम विकास शिक्षण संस्था नागपूर यांचेकडे वरील संस्थेद्वारे किती शैक्षणिक कॉलेजे चालवितात त्यांची माहिती मंजुरी वर्षासहीत संख्या सुरुवातीपासुन आतापर्यंत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी घेण्यात आलेली नाही किंवा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलाच्या संदर्भात माहिती मागविलेली शिक्षण संस्था श्रीराम ग्राम विकास शिक्षण संस्था नागपूरची स्थापना 1964 साली झाली संस्था शैक्षणिक कार्य करीत असून विनाअनुदानावर कार्य करते. आमचे माहितीपुसार विनाअनुदानीत संस्थेला

माहिती देण्याची गरज नसते व या बाबत ब–याच केसेस उच्च न्यायालयात सुरु आहेत. करीता माहिती देण्यात आलेली नाही असे अध्यक्ष प्रसन्ना बाबूराव तिडके यांनी आयोगास दि. 17.7.2010 ला कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.759-760

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>**निवड नस्ती**</u>

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 886/2010**

श्री नामदेव मुकुंदराव चिमुरकर
मु. पो. भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री मु. जे. वसु
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांचेकडे प्रभाकर सुदामणी चिमुरकर यांचे घराचे समोरीत खाली जागेचे सिटी सर्व्हे नकाशा तसेच भुमीगत नाली बांधकाम करणे बाबत सन 2002–03–04 चा कालावधीतील ग्रामपंचायत भिवापूर येथील ग्रामसभेत तसेच मासिक सभेत घेतलेल्या विषयान्वये ग्रामपंचायत भिवापूरचे कार्यालयीन दस्ताऐवज प्रोसीडींग तसेच ठराव आणि खर्च या बाबत लेखी आदेश प्रत 2003–04 ला केलेल्या कामाची सत्य खर्चीक बिले मजुरांचा खर्च इत्यादीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.5.2010 रोजी ग्रामविकास अधिकारी यांनी सिटी सर्व्हे नकाशाची मागणी असून ही कागदपत्रे हवी असल्यास भूमी अभिलेख कार्यालय भिवापूर यांचेशी संपर्क साधावा तसेच उर्वरीत मागितलेली माहिती तयार करणे सुरु असून काही माहिती हि रेकॉर्ड तपासून काढणे सुरु आहे असे कळविलेले आहे. व त्यानंतर दि. 5.6.2010 रोजी नाली बांधकामा बाबतची नमुद माहिती या कार्यालया कडून तयार करण्यात आलेली आहे. याबाबतची लागणारी दस्ताऐवजाची फी रु. 52/– भरणा करुन घेवून जावी. श्री प्रभाकर सुदामणी चिमुरकर यांचे जागेसंबंधीची वैयक्तिक माहिती हि संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करावी. दि. 5.4.2010 ला प्रत्यक्ष मौका चौकशी केलेली असून याबाबतचा अहवाल तयार केलेला नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दि. 24.6.2010 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतू खर्चाचा भरणा न करता अपीलकर्ता यांनी दि. 12.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला व त्यास प्रथम अपील असे संबोधीत केले. व त्यामध्ये पुन्हा नवीन विषय घेण्यात आले. व त्यामुळे सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.6.2010 रोजी लोक आयुक्त यांना पाठविलेले पत्र दि. 23.4.2003 ची प्रत सोबत जोडलेले आहे तसेच शासनास अहवाल

कसा काय पाठविलेला आहे त्याची सत्यप्रत मिळावी या संबंधात आपणास कळविण्यात येते की सदर प्रकरणाची नस्ती बंद झालेली असुन ती नष्ट करण्यात आलेली आहे त्यामुळे आपणास उपरोक्त अहवालाची सत्यप्रत देता येणार नाही असे कळविलेले आहे. व त्यानंतर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या घरासमोर नाली बांधकाम झाले आहे त्या संबंधी त्रास त्यांना होतो व त्याकरीता त्यांनी माहिती मागितलेली होती ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देत येत नाही किंवा टाळाटाळ करतो. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मागितलेला सिटी सर्व्हे नकाशा हा ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध नसतो. तसेच उर्वरीत माहिती साठी खर्चाचा भरणा करण्यासाठी सांगितले व विहित मुंदतीत सांगितले आहे. परंतू अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केला नाही. प्रथम अपील हे खंड विकास अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक होते परंतू ते त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील माहितीचा अर्ज ''अ'' नमुना व रु. 10 चे तिकिट अशा प्रकारे केलेला असून त्यामध्ये वेगळीच माहिती मागितलेली आहे. त्यामुळे ते प्रथम अपील हे होवू शकत नाही. व द्वितीय अपीलात सुध्दा त्यांनी वर्णन करतांना वेगळीच मुद्दे उपस्थित केलेले दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.762-763

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>निवड नस्ती</u>

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 114/2010**

श्री उदाराम लक्ष्मणराव डेकाटे
प्रेम नगर झेंडा चौक रस्ता
नागपूर 2 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्रीमती एच. पी. जडे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
साईबाबा हायस्कूल नर्मदा कॉलनी
काटोल रोड नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी त्यांचे अपील क्र. 973/2009 च्या दिनांक 17.11.2009 च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 22.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेले आहे. सदरच्या तक्रारीचा खुलासा दि. 12.4.2010 रोजी करण्यात आला होता. खुलासा दि. 19.4.2010 रोजी दाखल करण्यात आला असून अपीलार्थीस शाळेचे पत्र क्र. एसबीएचएस/134/2010 दि. 22.1.2010 ला दस्तऐवज क्र. 1 ते 21 प्रमाणे माहिती पाठविलेली आहे व माहिती पाठविल्याची पोस्टाची पावती सुध्दा घेतलेली आहे. परंतू तक्रारदार यांनी असे सांगितले की त्यांना ती माहिती मिळालेली नाही. अपीलाच्या निर्णयामध्ये रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी असे आदेश केलेले होते व त्याप्रमाणे ती रजिस्टर पोस्टाने पाठविणे आवश्यक होते. व तसे ती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी त्याकरीता तक्रारदार यांची मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येते. माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.
2) तक्रारदार व गैर तक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.765-

जा.क्र.————————— दि...................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 173/2010**

श्री ताराचंद शामराव वासनिक
53 राजगृह मिसाल ले आउट
जरीपटका रोड नागपूर 14 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्रीमती एच. पी. जडे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
मागासवर्गीय पशु व पक्षी पालन सहकारी संस्था मर्या.
आमगाव (देवळी) पो. मकरधोकडा
ता. उमरेड जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी त्यांचे अपील क्र. 215/2008 व अपील क्र. 351/2008 च्या संदर्भामध्ये दिनांक 20.3.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 11.1.2010 रोजी तक्रार क्रमांक 54/2010 दाखल केली होती. त्या तक्रारीचा निर्णय सुध्दा दि. 28.4.2010 रोजी देण्यात आला होता. व त्यामध्ये निर्णया पासून 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला होता. परंतू तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी सदरची तक्रार दाखल केली आहे. परंतू दि. 17.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी श्री चावरे यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या संदर्भामध्ये रु. 4,47,272/– खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे हा तक्रार अर्ज त्यांनी दाखल केलेला दिसून येतो.

2. मागासवर्गीय पशु व पक्षी पालन सहकारी संस्था मर्या. आमगाव (देवळी) यांचे तर्फे आज ॲड. एस.डी. खती हजर झाले असून त्यांनी आयोगापुढे खुलासा दाखल केलेला आहे. त्या खुलाशामध्ये सहकारी संस्था असल्यामुळे व कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनाकडून मिळत नसल्यामुळे सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू होत नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. व याच संस्थेच्या संदर्भामध्ये आयोगानी तसाच निर्णय दिलेला आहे असेही निदर्शनास आणले. व त्यामुळे सदरीची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैर तक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.766-767

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 3/2010**

श्री गजानन वामनराव ढाकूलकर
सुरज नगर प्लॉट नं. 41
नागपूर डिस्ट्रक्ट बॅंक जवळ रायपूर हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री व्ही. जी. लाढे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
गट ग्राम पंचायत वानाडोंगरी
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 17.7.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 24.12.2009 रोजी त्यांच्या अपील क्र. 369/2009 मधील निर्णय दिनांक 8.4.2009 च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून खुलासा दिनांक 16.1.2010 रोजी मागविण्यात आला होता. व त्याप्रमाणे दि. 11.2.2010 रोंजी खुलासा करण्यात आलेला आहे. तो खालीलप्रमाणे.

आपल्या आदेशानुसार श्री गजानन वामनराव ढाकूलकर यांनी दि. 1.7.09 चे जा. क्र.....नुसार श्री ढाकुलकर यांना दि. 5.7.09 ला रविवारी माहिती पाहण्यासाठी व देण्यासाठी कळविण्यात आले. रविवारी ग्रा.पं.ला शांतपणे माहिती पाहता यावी व अर्जदारास माहिती देणे सोईस्कर होईल या उद्येशाने माहिती घेण्यासाठी बोलविले. परंतु अर्जदार श्री गजानन वामनराव ढाकूलकर हे हेतुपुरस्पर दि. 5.7.09 ला गैरहजर राहिले व श्री साळुंके यांची खोटी तक्रार आपणाकडे केलेली आहे. दि.5.7.09 ला ग्रा.पं.कार्यालय उघडी असल्याबाबत सरपंच तथा ग्रा.पं.परिसरातील नागरिकांचे पुरावे सोबत जोडलेले आहे.

श्री ढाकुलकर हे दि. 5.7.09 ला न आल्यामुळे त्यांना या कार्यालयाचे पत्र दि. 8.7.09 ला पुनश्च दि. 10.7.09 ला दुपारी 12.30 वा माहिती पाहणी करुन व आवश्यक ती माहिती आपणास देता येईल याकरिता कळविण्यात आले.

दि. 10.7.09 ला दुपारी 12.30 अर्जदार श्री गजानन वामनराव ढाकूलकर हे माहिती पाहण्याकरिता आले असता त्यांच्या समोर मागितलेली माहिती ठेवण्यात आली
असे निदर्शनास आले व त्यांना असे लेखी मागितले असता मी लेखी देत नाही असे सांगण्यात आले व माहिती पाहण्यास सुरुवात केली असल्याचे अर्जदाराच्या अर्जावरुन आपणास दिसुन येईलच. अर्जदार हा माझया सोबत दिवसभर माहिती अधिकारी श्री आर. सी. साळुंके हे बसुन रहायला हवेत असा विनाकारण आग्रह धर होते असे निदर्शनास येते.

परंतु श्री ढाकुलकर यांनी 2 तास ग्रा. पं. चे अभिलेखे पाहले व मी तुमची तक्रार करतो व दमदाटी भरुन ग्रा.पं.मधुन माहिती न घेता निघुन गेले.

मा. महोदय, आपण दिलेल्या आदेशानुसारच अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. परंतु अर्जदारास माहिती पेक्षा श्री साळुंके ग्रामसेवकावर कारवाईच व्हावी अशी तीव्र इच्छा दिसुन येते. माहितीच्या अधिकारामध्ये अर्जदार खोटी तक्रार देवून ग्रामसेवकावर निरर्थक आरोप करीत आहे.

तरी यापुढे सुध्दा अर्जदारास माहिती पुरविण्यास तयार आहे. परंतु अर्जदाराने प्रामाणिकपणे मला माहिती पाहण्यासाठी दिनांक व वेळ देण्यात यावी व उपरोक्त दिनी अपीलीय अधिकारी यांच्या समक्ष मी पुनश्च माहिती देण्यास कटीबध्द आहे.

तरी साळुंके यांनी नियमानुसारच कार्यवाही केली असुन कर्तव्यामध्ये कोणताही कसुर केलेला नाही करिता विनंती अर्ज आपणाकडे सादर करण्यात येत आहे.

सदरच्या वरील खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती दाखविल्याच्या संदर्भात सरपंच व इतर 9 व्यक्तींनी आयोगाकडे पुरावा दाखल केलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती दाखविली होती व ती जन माहिती अधिकारी यांचे समोर दाखविण्यात आली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहितीचे अभिलेखे उपलब्ध करुन देवून दाखविण्यात यावी. दि. 8.4.2009 च्या निर्णया मधील आदेशा मध्ये अपीलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवसाची तारीख ही जन माहिती अधिकारी यांना कळवावयाची होती. जन माहिती अधिकारी यांनी तारीख कळवावयाची नव्हती व त्यामुळे आता सुध्दा कामकाजाच्या दिवसाची तारीख ही तक्रारदार यांनीच तारीख व वेळ ही जन माहिती अधिकारी यांना कळवावयाची आहे व त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे अपेक्षित असलेली माहिती निर्णयासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तक्रारदार व गैरतक्रारदार उपस्थित झाल्यावर व माहिती दाखविल्यानंतर लेखी घेणे आवश्यक आहे. तक्रारदार यांनी सुध्दा लेखी देणे आवश्यक आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी उपस्थित राहून त्यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी. ग्राम विकास अधिकारी यांनी गावातील 4 पंचाच्या सहया माहिती दाखविल्यावर घ्याव्यात.

2) तक्रारदार व गैर तक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.769-770

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 891/2010**

श्री कुंदनलाल मणिराम प्रजापति
रंजन बिछायत केंद्र हंसापूरी धोंडबा चौक
नागपूर ता. जि. नागपूर 440018 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री निराला विद्यलय एव ज्यु. कॉलेज नागपूर
हंसापूरी सेन्ट्रल एव्येन्यू नागपूर 440018
2) श्रीमती बी. ए. रहीम
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
श्री निराला विद्यलय एव ज्यु. कॉलेज नागपूर
हंसापूरी सेन्ट्रल एव्येन्यू नागपूर 440018 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.7.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 29.6.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हे नंतर हजर झाले. व त्यांनी खुलासा दाखल करण्याकरीता मुदत मागितली. ती मुदत त्यांना दि. 21.7.2010 रोजी खुलासा दाखल करावा अशी तोंडी होती त्याप्रमाणे त्यांनी आज खुलासा दाखल केलेला आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.4.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्री निराला विद्यालय एव ज्यु. कॉलेज नागपूर यांचेकडे 1) श्री निराला विद्यालय एव ज्यु. कॉलेज नागपूरके रोष्टर की सत्र 2003–04 से 2009–10 तक संपूर्ण माहिती दस्तावेज सहित मिलने बाबत (7 साल की) 2) श्री के.एम.प्रजापति की पेंशन, जीपीएफ, जीआईएस अगस्त सितंबर 09 का वेतन पाचवे पे अेरीअर्स इनकॅशमेंट लिव्ह का लाभ ब्याज सहीत मिलने बाबत उसपर हुई कार्यवाही की माहिती संपूर्ण दस्ताऐवज सहित मिलनेबाबत. 15 दिनमें मिलने संबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.5.2010 रोजी मुख्याध्यापिका यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी रोष्टर बाबतची माहिती ही मुख्याध्यापिका म्हणून त्यांचेकडे नाही तर संस्थेकडे आहे व त्यांनी संस्थेला माहिती मागावी. तसेच मुद्या क्र.2 च्या संदर्भामध्ये दि. 9.4.2010 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचे समक्ष सुनावणीमध्ये संपूर्ण दस्तऐवज पाहिला. शिक्षणाधिकारी यांचे समक्ष दिला गेलेला आहे व ती माहिती त्यांचेकडून घ्यावी असे कळविलेले होते. असे काहीही घडलेले नसल्यामुळे त्यांनी ही माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे आज ॲड. एस.के.हटवार यांनी युक्तीवाद करतांना जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला युक्तीवाद सुध्दा दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी

म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले नसल्यामुळे द्वितीय अपील हे चालू शकत नाही असा युक्तीवाद केला. तसेच सदरची माहिती ही मुख्याध्यापिका म्हणून त्यांचेकडे उपलब्ध नाही त तसेही अपीलकर्ता यांना मा. शिक्षणाधिकारी यांचे माध्यमातून दि. 9.4.2010 ला देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता हे वरिष्ठ लिपीक होते. निधीची अफरातफर व इतर गैरप्रकार संदर्भात व्यवस्थापनानी त्यांना निलंबीत केले होते आणि पोलीस स्टेशन कडे तक्रार दाखल केली होती. पोलीस चौकशी झाल्यावर पोलीस अधिकारी यांनी त्यांचे विरुध्द कलम 420, 468, 471 व 34 भादंसं नुसार गुन्हा दाखल केला आहे. व त्यामुळे संस्थेवर दबाव आणण्याच्या दृष्टीने त्यांनी माहिती मागण्याचा प्रयत्न केला आहे. ते सेवानिवृत्त सुध्दा आहे. वर त्यांना आता रोष्टरची आवश्यकता नाही तरी सुध्दा त्यांनी ती माहिती मागितली. व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात यावे अशी विनंती केली आहे. व तसेही निराला एज्युकेशन द्वारा संचालीत निराला शिक्षण संस्था हया शाळा लेट बंसराजसींग ठाकूर शिक्षण संस्थेला हस्तांतरीत केलेला असल्यामुळे रोष्टर संस्थेकडे हस्तांतरीत केलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत दिलेली आहे. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे दाखल करणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे प्रथम अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.772-773

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

<u>**निवड नस्ती**</u>

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 16/2010

श्री इन्द्रकुमार साधुराम लेहरवानी
5 बी जरीपटका नागपूर 14 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा सचिव/प्राचार्य
सिंधु एज्युकेशन सोसायटी
महात्मा गांधी सेंटिनियल सिंधु हायस्कुल
जरीपटका नागपूर 14 ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 21.7.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 17.12.2009 रोजी अपील क्र. 863/2009 व अपील क्र. 864/2009 च्या दिनांक 16.10.2009 च्या निर्णयातील आदेश क्र. प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. त्यावर आयोगाचे कार्यालयातून दि. 25.1.2010 रोजी खुलासा मागविण्यात आला होता व तो खुलासा दि. 25.2.2010 रोजी दाखल केलेला आहे. परंतू खुलाशामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती ती महात्मा गांधी शाळे संबंधी नसून सिंधु एज्युकेशन सोसायटी संदर्भात आहे. व त्यामुळे सिंधु एज्युकेशन सोसायटी ही सार्वजनिक विश्वस्त संस्था असल्यामुळे व शासनाचे कोणतेही अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होत नाही. त्याकरीता त्यांनी नगर युवक शिक्षण संस्था नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग या याचिका क्र. 5132 ऑफ 2008 (निर्णय दि. 20.8.2009) मध्ये सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाचे अनुदान नसेल तर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. व जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी आयोगाचे पुढे युक्तीवाद केला की सिंधु एज्युकेशन सोसायटी हिस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य किंवा अनुदान मिळत नाही.

2. त्यावर तक्रारदार यांनी आयोगाकडे सिंधु एज्युकेशन सोसायटीला शासनाने नाममात्र भाडेपटटयाच्या सवलतीच्या दराने शासकीय जमीन दिल्याचा शासन निर्णय सादर केला आहे तो येणेप्रमाणे ''सिंधु एज्युकेशन सोसायटी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. LRF-4965/190978-B सचिवालय मुंबई 32 दि. 28.10. 1966 Letter from the Collector Nagpur No.256/63 (नझूल) (निर्णय दि. 20.8. 2009) dt. 6th July 1966 endorsement from the Commessioner Nagpur Division No. B/14658/LND/3/0-CR-477/XCII/66 dt. 31.7.66 या शासन निर्णयाप्रमाणे Land measuring 13, 193 sq.ft. and 2280 sq.ft. shown by letters A

B C D & E F D in the site plan furnished by the society out of kh.no. 25/1 25/2 & 27/4 of mouza Jaripatka (valued as revenue free holding at Rs. 6332-64 and Rs. 10982-40 rdsp.) to the Sindhu Education Society, Nagpur free of premium or payment of nominal rent of Re.1/- per annum for a period of 15 years for the purpose of a play ground subject to the conditions laid down in rule 3 of Part II-4 of the rules referred to above and to the following further conditions –

i) that the land should be utilized as a play ground within a period of two years from the date of handing over the possession of the land to the society,

ii) that the land should be used fo the purpose for which the lease is made and for no other purpose and no profit should be derived out of it,

iii) that the land should be kept open and no construction whatever nature should be made thereon,

iv) that the lease should be conditional upon the continued recognition of the school by the Education Department,

v) that the lease is liable to be cancelled and the land resumed without payment of compensation for breach of any of the above conditions,

2. The Collector should be requested to get a sanad (evidencing the above lease) in form BB executed as required by rule 3-B (2) of Part II of the rules framed under Section 164(3) of the Madhya Pradesh Land Revenue Code 1954.

3. This Government Resolution issues in exercise of the powers delegated to this Department in Government Memorandum Finance Department No. ODO-1060/17889/VI dated the 15th November, 1966.

3. तसेच कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील सिंधु एज्युकेशन सोसायटी नागपूर 100 टक्के अनुदान प्राप्त वर्ष 2000–01 च्या इमारत खर्च, मान्य खर्चाचे एकूण खर्च या संदर्भातील वेतनेत्तर अनुदान खाते क्र.02 नागपूर दि. 1.10.2001 ची छायांकित प्रत तसेच 2002–03 करीता अनुदान आकारणीचा तक्ताची छायांकित प्रत दि. 10.1.2003 व 2002–03 दि. 15.4.2004 ची छायांकित प्रत दाखल केलेली आहे व त्यावरुन संस्थेला वेतनेत्तर अनुदान सुध्दा मिळालेले दिसून येते. व त्यामुळे सदरच्या संस्थेस शासनाच्या निधीच्या स्वरुपात अनुदान असल्यामुळे सदरची संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधील (ज) मध्ये ''सार्वजनिक प्राधिकरण'' या संज्ञेच्या व्याख्येत येते.

4. त्याकरीता याचिका क्र. CMWP No. 4747 of 2008 decided on 24.1.2008 धासींग गर्ल्स हायस्कूल गाझीयाबाद वि. उत्तर प्रदेश (AIR 2008 Allahabad 92) मध्ये "Whatever there is even and IOTAof nexus regarding control and finance of

public authority over the activity of a private Body or Institution or an Organization etc. the same would fall under the provisions of Sec. II(H) of the Act" (Right to Information Act 2005) (AIR 2008 Punjab & Hariyana 117) DAV College Trust & Management Society Vs Director of Public Instrction CWP No. 2626 of 2008 decided on 25.2.2008 Public Authority definition includes educational institution receiving substantial grant in aid from State Organisation – Petitioner institution was initially even grant to extent of 95% for building its own infrastructure subsequent reduction of granting aid to 45% cannot be ground to stay that no substantial grant in aid was received in institution also deicharging public function it would tally within ambit of Public Authority.

5. वरील दोन्ही निर्णय व तक्रारदार यांनी आयोगापुढे दाखल केलेली वर नमूद केलेली कागदपत्रे यावरुन सिंधु एज्युकेशन सोसायटीला खेळाचे मैदान हे सवलतीच्या भाडेपटयानी मिळालेले आहे व वेतनेत्तर अनुदान सुध्दा मिळत असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 2 (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये सिंधु एज्युकेशन सोसायटी ही समाविष्ट होते. तक्रारदार यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे हे सिंधु एज्युकेशन सोसायटीस बंधनकारक आहे. त्याकरीता सिंधु एज्युकेशन सोसायटीने अधिनियमाच्या कलम 5 प्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहिल. तसेच अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 24.2.2009 च्या अर्जाप्रमाणे व आयोगाच्या दिनांक 16.10.2009 च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच रु. 25000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा किंवा त्यांचे म्हणणे दोन वेळेस संधी देवूनही मांडले नाही त्या कारणास्तव सिंधु एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी किंवा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. तक्रारदार यांनी अर्ज हा सचिव माहिती अधिकारी म्हणून सिंधु एज्युकेशन सोसायटीकडे केला होता व त्यामुळे ते किंवा संस्था शास्तीस पात्र राहतील. व त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही मंजुर करण्यात येत असून सिंधु एज्युकेशन सोसायटीने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती अधिनियमाच्या कलम 5 प्रमाणे करावी. जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती झाल्यानंतर 10 दिवसाचे आंत तक्रारदार यांना त्यांनी दि. 24.2. 2009 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) सिंधु एज्युकेशन सोसायटीने अनुसानित असून सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी लागू असून सुध्दा त्या लागू नाही या कारणास्तव माहिती दिली नाही तसेच आयोगाच्या निर्णया प्रमाणे सुध्दा माहिती दिली नाही व रु. 25000/– चा दंड कां करु नये याबाबतचा खुलासा दिला नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येते. सदर शास्तीची वसुली ही **शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर** यांनी त्यांना सदरच्या अनुदानात असलेल्या अधिकाराच्या संदर्भात वापर करुन वसूल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.762-765

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 902/2010**

श्री राजा खान महेबुब खान
सुमित अपार्टमेंट शनिवारी कॉटन मार्केट
घर क्र.279/एफ/1 ब्लॉक क्र. 1, 1 ला माळा
सुभाष रोड नागपूर 18 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रमेश सोनटक्के
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशील सिनेमा जवळ, रामदासपेठ, वर्धा रोड, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशील सिनेमा जवळ, रामदासपेठ, वर्धा रोड, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ नागपूर यांचेकडे वर्ष 2005 ते 2010 करीता वे.को.लि. एस.ई.सि.एल. कोळसा कंपनी सोबत कोळसा खरेदी करारनाम्या (Full agreement) ची सत्यप्रत द्यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.3.2010 रोजी करारनाम्याची सत्यप्रत कार्यालयात तयार असल्याने त्याचा अंदाजे खर्च रु. 192/- हया कार्यालयात जमा करावी टपाल खर्चासह असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2010 रोजी रु. 192/- चा भरणा केलेला दिसून येतो. व त्यानंतर त्यांना दि. 22.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव दि. 19.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.5.2010 रोजी देण्यात आलेला असून अपील नस्तीबध्द करण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या खर्चाचा भरणा करण्यास सांगितला ते पत्र 30 व्या दिवशी दिले व ते पत्र त्यांना 30 दिवसानंतर मिळाले. त्यानंतर 1 महिन्याभरात माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी न घेता खर्चाचे पत्र विहित मुदतीत दिले या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती घेणार असे अर्जात नमूद केलेले असल्यामुळे

त्यांना खर्चाचे पत्र व माहिती ही व्यक्तिशः न आल्यामुळे उपलब्ध करुन देण्यात आले. व्यक्तिशः माहिती मागितल्यावर अर्जदाराने स्वतः जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. व्यक्तिशः नमूद केल्यामुळे जन माहिती अधिकारी हे अर्जदाराची येण्याची वाट बघत असतात. परंतू अर्जदार हे 30 दिवस पूर्ण होईपर्यंत येत नाही व त्यामुळेच शेवटी 30 व्या दिवशी खर्चाचे पत्र देण्यात आलेले आहे. तसेही करारनामा हा जन माहिती अधिकारी यांचे नागपूर येथील कार्यालयात उपलब्ध नव्हते व तो मुंबई येथील कार्यालयातून मागविण्यात आला. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

4. परंतू जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाशावरुन व अपीलकर्ता यांना मिळालेल्या माहितीच्या एकूण पत्रव्यवहारावरुन माहिती ही विलंबानेच उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. खर्चाचे पत्र जरी मुदतीत दिलेले असले तरी माहिती ही 30 दिवसात उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या कलम 7 (3) अन्वये माहिती विनामुल्य उपलब्ध होणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवूनच निर्णय देणे आवश्यक असते. परंतू एकूणच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतुदीचे काही ज्ञान आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी भरलेल्या खर्चाचा भरणा हा परत करणे संयुक्तिक राहिल. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्याचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी वैयक्तिकरित्या सोसणे आवश्यक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी भरणा केलेला अतिरिक्त खर्च रु. 192/– त्यांना परत करण्यात यावे.
2) माहिती पुरविण्याचा रु. 192/– चा खर्च हा जन माहिती अधिकारी यांचे दरमहााचे वेतनातून वसुल करावा.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.778-779

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**निवड नस्ती**

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 905/2010**

श्री अनिल खुबचंद संकत
93/बी वाल्मिकीनगर गोकुळपेठ
नागपूर 10 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पंकज वानखेडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
प्लॉट नं. 8 सहकार सदर हिंदुस्थान कॉलनी
अमरावती रोड नागपूर
2) श्री दिपक बेदरकर
जन माहिती अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी
नागपूर मेहतर विविध उद्येशिय सहकारी संस्था मर्या.
नागपूर ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.3.2010 रोजी श्री डी. के. बेदरकर जन माहिती अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी नागपूर मेहतर विविध उद्येशिय सहकारी संस्था मर्या. नागपूर यांचेकडे संबंधित सहकारी संस्थेच्या निवडणूकीच्या संदर्भामधील माहिती दोन मुद्यांच्या संदर्भात मागितलेली होती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 29.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 28.5.2010 रोजी देण्यात आलेला असून निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया ही गुप्त असल्याने व निवडणूकीचे सर्व दस्तऐवज व लिफाफे (सिलबंद केलेले) हे संस्थेचे व्यवस्थापक श्री दामणकर यांचेकडे सुपूर्द करण्यात आल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी पूर्वी उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे माहिती मागितली होती. परंतू त्यांनी सदरहू निवडणूक संबंधीची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी नागपूर मेहतर विविध उद्येशिय सहकारी संस्था मर्या.
नागपूर यांचेकडून घेण्यात यावे असे कळविल्यामुळे सदरचा अर्ज हा त्यांनी संस्थेमध्ये दिला होता. व त्यांना ती माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे

सांगितले की ते शासकीय अधिकारी असून संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी असले तरी ते सहाय्यक निबंधक यांचे कार्यालयात असतात. त्यांचेकडे सदरचा अर्ज प्राप्त झालेला नाही. अपीलकर्ता यांनी सदरचा अर्ज हा संस्थेकडे दिलेला आहे असे दिसून येते. व तयांनी तसे मान्यही केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही. व तशीही संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व ती निवडणूक गुप्त असल्यामुळे सर्व कागदपत्रे व मतपत्रिका हे सील करुन संस्थेच्या व्यवस्थापकाच्या ताब्यात दिले जातात. व संस्थेच्या निवडणूक नियमाप्रमाणे सदरची कागदपत्रे ही मा. न्यायालयाच्या आदेशा शिवाय उघडता येत नाही व तसेही अपीलकर्ता यांनी सदरच्या निवडणूकीस न्यायालयात आव्हान दिलेले असल्यामुळे न्यायालयात त्यांना संपूर्ण कागदपत्रे न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे मागून निर्णय करुन घेता येईल. परंतू जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी मा. न्यायालयाच्या आदेशा शिवाय निवडणूकीच्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देवून शकत नाही. व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.774-775

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 901/2010

सौ. शिंदे अनुग्रहा अरविंदकुमार
प्लॉट नं. 2/17 विश्राम नगर सोसायटी
राजाबाक्षा नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषी सहसंचालक आस्था
कृषी आयुक्तालय, म.रा.साखर संकुल पुणे
शिवाजी नगर पुणे 411005
2) श्री बी. एम. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक (कक)
कृषी आयुक्तालय, म.रा.साखर संकुल पुणे
शिवाजी नगर पुणे 411001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2009 रोजी श्री शि. बा. राजवाडे तात्कालीन ता.कृ.अ. कुही सध्या अधिनस्त मा. विभागीय कृषी सहसंचालक नागपूर विभाग नागपूर यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही संबंधाने (चौकशी) शासनाने प्रस्थापित केली आहे का? प्रस्थापित केली असल्यास माहिती देण्यात यावी. अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी प्रशासकीय विभाग (आस्थापना) कृषी आयुक्तालय, म.रा. पुणे यांना नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.12.2009 रोजी चौकशी सुरु आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.2.2010 रोजी देण्यात आलेला असून अपील फेटाळलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदरचा अर्ज दि. 24.11.2009 रोजी

मागितलेली माहिती ही संबंधित शाखेकडे असल्यामुळे दि. 24.11.2009 रोजी हस्तांतर करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 7.12.2009 रोजी अंशतः माहिती उपलब्ध करुन दिली व उर्वरीत माहिती नाकारलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पुन्हा असे निदर्शनास आणले की आयोगाचे निर्णयामध्ये एखाद्या प्रकरणात चौकशी सुरु असली तरी चौकशी पुर्ण होईपर्यंत व निर्णय होईपर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे ही बाब त्या चौकशीच्यावर कोणत्याही प्रकारचा विपरीत परीणाम होवू नये म्हणून अपवाद अधिनियमाच्या कलम 8 (1) प्रमाणे करता येतो व त्या संदर्भात माहितीच्या संदर्भामध्ये प्राथमिक चौकशी अहवाल सादर झालेला असून दोषारोपपत्र सादर झाल्यानंतरच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.784-785

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 907/2010 व**
**अपील क्रमांक नाग 908/2010**

श्री अशोक नारायणराव दरोडे
सुभाष पुतला सतरंजीपुरा लकडगंज नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिप डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी
नागपूर
2) श्री सी. एस. खंडाईत
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
संजय गांधी निराधार योजना(मनपा क्षेत्र) नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 907/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 28.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे पुष्पा लहु कापसे द्वारा दाखल केलेले अर्ज दि. 6.2.2008 ला (विधवा) संजय गांधी निराधार योजना पूर्व विभाग नागपूर अंतर्गत दाखल केलेले अर्जाची संपूर्ण सत्यप्रत. तसेच अर्जासोबत कार्यालयाचे टोकन व कार्यालयात दिलेल्या अर्ज दि. 24.2.2010 ची झेरॉक्स प्रत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.4.2010 रोजी संबंधित माहिती ही कार्यालयाचे तत्कालीन कनिष्ठ लिपीक श्रीमती पुष्पा अवझे यांच्या कार्यालयातील असल्याने त्यांना दि. 21.4.2010 नुसार शोध घेण्यास सुचीत करण्यात आले असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा प्रकरणात शोध घेवून 7 दिवसाचे आत निःशुल्क माहिती देण्याकरीता आदेश पारीत केले व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. परंतू अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरच्या प्रकरणाचा शोध लागलेला असून आपण मागितलेल्या प्रकरणाची सत्यप्रत एकूण 12 पृष्ठे आपणास उपलब्ध करुन देण्यात येतात असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांची तक्रार नाही असे आयोगापुढे सांगितले. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 908/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 11.3.2010 रोजी माहिती अधिकारी तहसिलदार यांचेकडे राष्ट्रीय कुटुंब अर्थ सहाय्य योजने अंतर्गत दि. 11.2006 ते 32.2.2006 या वर्षात ज्या ज्या अर्जदारांना धनादेश वाटप झाले आहे त्या सर्व अर्जदारांने केलेले अर्जामधील अर्ज व मृत्यप्रमाणपत्राची सत्याप्रत मिळण्याकरीता माहिती व्यक्तिशः घेणार अशी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.4.2010 रोजी आपण मागणी केलेली माहिती मोठया प्रमाणात असल्याने व प्रकरणे हाताळणे या कार्यालयीन वेळेचा अवव्यय होईल तसेच या कार्यालयात आधीच कर्मचा–याची कमतरता असल्याने कर्मचारी यांच्याकडे इतर कार्यालयीन कामे मोठया प्रमाणात असल्याने ही माहिती पुरविता येणार नाही. तथापि विशिष्ट प्रकरणाबाबत माहिती मागितल्यासच माहिती पुरविता येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.5.2010 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये धनादेश वाटप करतांना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे व त्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकढे खुलासा करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विशिष्ट प्रकरणात मागितलेली नाही. ती मोघम व व्यापक प्रमाणात मागितलेली आहे. अपीलकर्ता यांनी विशिष्ट प्रकरणात माहिती मागितल्यास त्यांना ती उपलब्ध करुन देता येईल. अशा प्रकारे मोघम व व्यापक प्रमाणात माहिती मागितल्यास कार्यालयाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी लागेल. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे हे सध्या तरी अशक्य आहे. अपीलकर्ता हे अशा प्रकारे मोघम व व्यापक प्रमाणात माहितीची मागणी करतात व त्यातून संबंधीत प्रकरणातील संबंधित लाभार्थ्याशी संपर्क साधतात. सदरचे लाभार्थी हे त्यानंतर कार्यालयात येवून माहिती का दिली म्हणून तक्रार करतात. सदरची माहिती ही लाभार्थी म्हणून त्रयस्थ पक्षाची माहिती असली तरी मोघम व व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणून सर्वच लाभार्थ्याना पत्रव्यवहार करुन त्यांची संमती मागणे हे सुध्दा अशक्य आहे. अपीलकर्ता यांनी आतापर्यंत एकुण 33 अर्ज या कार्यालयात सादर केलेले आहे. व त्या 33 अर्जामध्ये त्या त्या अर्जदारास किती अनुदान देण्यात आले तसेच अनुदान नाही दिल्यास कोणत्या कारणास्तव देण्यात आले नाही याबद्यलची माहिती मागतात. तसेच बॅक, पोष्ट ऑफीस या सर्व खात्याची माहिती मागतात. वास्तविक या कोणत्याही लाभार्थ्याच्या संदर्भात अपीलकर्ता यांचा काहीही संबंध नाही. लाभार्थ्यानी केलेल्या तक्रारी प्रमाणे लाभार्थ्याशी संपर्क साधून त्यांचेकडे अवाजवी मागणी करतात व त्यामुळेच खर्चाचा भरणा करण्यास ते तयार असतात. विशिष्ट प्रकरणात माहिती मागितली तर ती देता येईल व त्या कारणास्तव त्यांना माहिती नाकारलेली आहे. असे असले तर अपीलकर्ता यांना सदरच्या अर्जामध्ये त्यांनी मागितलेल्या कामावधीतील नस्त्याचे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी संबंधित आवश्यक त्या नस्त्याचे निरीक्षण करावे व त्यातील मृत्युपत्र व अर्जाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्यास खर्चाचा भरणा करणे संयुक्तिक राहिल. मात्र या संदर्भात लाभार्थ्याची तक्रार आल्यास जन माहिती अधिकारी यांनी पोलीस तक्रार करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. नाग 907/2010 हे खारीज करण्यात येते.
2) अपील क्र. नाग 908/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करावे व त्यातून आवश्यक असतील त्या नस्तीतील (सरसकट नस्त्यामधील नाही) आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती प्रति पृष्ठ 2 रु. प्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात घ्यावी. व उपलब्ध कागदपत्रांमधून आवश्यक ती कागदपत्राच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांनी विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या व पोच द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.787-789

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 921/2010**

श्री शांतीलाल राजाराम दाखने
भगवती कृपा, निवास, मातामंदिर,
गेविंदपूर रोड, सिव्हल लाईन्स, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री एम. एस. श्रीभद्रे
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक
जे. एम. कनिष्ठ महाविद्यालय, कन्हारटोली, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक जे. एम. कनिष्ठ महाविद्यालय, कन्हारटोली, गोंदिया यांचेकडे शाळा सेवाशर्ती नियमावलीनुसार कोणकोणत्या कारणास्तव शिक्षक कर्मचा–यांचा पगार कापता येतो. यासंबंधी सेवाशर्ती नियम क्रमांक व त्यासंबंधातील शब्द व रचना व दंड करण्या संबंधीचे प्रावधान व अधिकार प्राचार्य/मुख्याध्यापकास आहेत त्याचा तपशिल अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही किंवा पत्रव्यवहारही केलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.4.2010 रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.7.2010 रोजी देण्यात आलेला असून माहिती पोष्टाद्वारे त्वरीत पुरविण्याची व्यवस्था करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपीलासोबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतेच उत्तर अथवा पत्रव्यवहारही केलेला नाही असे लेखी कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरची माहिती ही संस्थेचे सचिव यांचे कार्यालयात असल्यामुळे उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतू अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती ही रजा नियम किंवा इतर नियमाच्या संदर्भातील माहिती दिसून येते. व सदरची नियमावली ही संस्थेच्या कार्यालयात असण्याचे कारण नाही ती मुख्याध्यापक

किंवा प्राचार्य यांचेकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. व त्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा पत्रव्यवहारही केलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या बद्यल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की आता चुक झालेली आहे पुढे अशी चुक होणार नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही संस्थेचे सचिव कार्यालयात असते असे सांगून आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेंत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना 10 दिवसाचे आंत नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली माहिती विनामुल्य पुरवावी.
2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 19.3.2010 अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 500/– ची शास्ती लादण्यात येते सदरची शास्तीची वसुली शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.775-776

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 916/2010

श्री जनार्दन गुलाबराव मून
791 नागसेनवन नागपूर
ता. जि. नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. आर. कांबळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
ता. जि. पुणे 1.
2) श्री एम. व्ही. पावरा
जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक(राज)
अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
ता. जि. पुणे 1. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक(राज) अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे 1) एप्रिल 2008 ते आजपर्यंत अपंगाच्या नविन शाळा अनुदानावर आणण्यासाठी आयुक्त कार्यालयातून केलेल्या कार्यवाही संबंधातील फाईलची संपूर्ण नोटशिटची झेरॉक्स प्रत. 2) शासनाकडे आयुक्त स्तरावरुन पाठविण्यात आलेले शिफारस पत्र व शाळा आणि संस्थेची यादी.
3) शासनाकडून अनुदानावर मंजूर झालेल्या अपंगाच्या शाळा व संस्थेची यादी साधारण टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.6.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांचे अपील त्यांच्या अनुपस्थितीच्या कारणावरुन निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 12.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती 30 दिवसा मध्ये उपलब्ध करुन दिलेली नाही व त्याकरीता दिलेला खुलासा हा संयुक्तीक नाही. तो आयोगाची सुध्दा दिशाभूल करणारा खुलासा आहे. लोकसभेची निवडणूक हा अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2010 रोजी अर्ज केल्यावेळेस किंवा आसपास नव्हत्या व त्यामुळे त्या कारणास्तव समन्वयक रजेवर गेले हे कारण आयोगाच्या डोळयात धुळ फेकणारे आहे. वास्तविक प्रथम अपीलाच्या निर्णयावरुन चार माहिती अधिकारी आहेत व चार माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध होवू शकत नाही ही बाब पटण्यासारखी नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देतांना त्यांना अधिनियमाच्या तरतुदीची काहीही माहिती नाही असे दिसून येते. त्यांचे कार्यालयामध्ये चार माहिती अधिकारी असून सुध्दा व अपीलकर्ता यांनी अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे प्रथम अपीलात म्हटलेले असून सुध्दा चारही माहिती अधिका–यांना माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही असे विचारलेले दिसून येत नाही. अपीलकर्ता प्रथम अपीलाच्या सुनावणीत जरी हजर असते तरी त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असाच युक्तीवाद केला असता. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या बुध्दीमत्ते प्रमाणे त्यांना अपीलकर्ता यांचेकडून आणखी काय प्रकाश पाडून हवा होता ते त्यांनाच माहित. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (5) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही व दिली नसल्यास का दिली नाही याबद्यल जन माहिती अधिका–यांस सिध्द करावे लागते. परंतू याबाबत उपआयुक्त पदावरील अधिका–यांचे प्रबोधन झालेले आहे असे दिसून येत नाही. व त्यांना ते करुन घ्यावेसे वाटलेले दिसून येत नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ ही संपूर्ण आयुक्त कार्यालयानीच केलेली दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती ही मुद्या क्र. 3 च्या सहीत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. माहितीचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा आहे. शासनाकडे खर्ची घालता येणार नाही.

2) प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये चार माहिती अधिकारी हे जाब देणार असे दाखविलेले असल्यामुळे चारही माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असून सुध्दा विहित मुदतीत माहिती तर उपलब्ध करुन दिली नाहीच परंतू पत्रव्यवहार सुध्दा केलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे प्रत्येकी रु. 1000/– ची शास्ती लादण्यात

येते. सदरची शास्तीची वसुली **आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे** यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतुदीची माहिती नसल्यामुळे व माहिती उपलब्ध न करुन देण्याकरीता त्यांनी संगनमत केल्याचे दिसून आल्यामुळे तसेच त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे 1** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.778-780

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 917/2010

श्री कुंदनलाल मणिराम प्रजापति
रंजन बिछायत केन्द्र, हंसापूरी, धोंडबा चौक, नागपूर
ता. जि. 44018 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापिका
निराला कॉन्वेंट, हंसापूरी
सी.ए.रोड नागपूर 18
2) श्रीमती आशा दिपक केसवानी
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
निराला कॉन्वेंट, हंसापूरी
सी.ए.रोड नागपूर 18 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी उपस्थित राहण्याची सही केली आहे. सुनावणीच्या वेळेस हजर राहिलेले नाही. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. श्री एस. के. हटवार हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका निराला कॉन्वेंट यांचेकडे 1) सत्र 2009–10 में कक्षा 5 वी से 10 वी तक कितने विद्यार्थियों ने प्रवेश लिया उनकी सूची देनेबाबत. 2) सत्र 2009–10 में कक्षा 5 वी से 9 वी तक वार्षिक परीक्षा मे सम्मीलित हुऐ विद्यार्थियो में उत्तीर्ण एवं अनुत्तीर्ण हुऐ विद्यार्थियो की संपूर्ण सूची प्रदान करने बाबत माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.6. 2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 12.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचे तर्फे वकील यांनी युक्तीवाद केला. त्यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांना अफरातफरीच्या कारणास्तव शाळेतील वरिष्ठ लिपीकाच्या पदावरुन निलंबीत करण्यात आलेले आहे व त्यांचे विरुध्द भा.दं.वि. 420, 468, 471 कलम 34 सहित गुन्हा दाखल केलेला आहे. व त्यामुळेच ते अशा पध्दतीने अनेक अर्ज करुन कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नसतांना माहिती मागत आहेत व तसेही दि. 30.1.2010 ला शिक्षण उपसंचालक यांनी निराला शिक्षण संस्था ही नवीन शिक्षण संस्था कै. बंसराजसींग ठाकूर शिक्षण संस्थेकडे हस्तांतर केल्याचे आदेश केलेले आहे. व त्यामुळे निराला कॉन्वेंट यांचेकडे अर्ज केलेला असल्यामुळे तो नियमानुसार नाही. परंतू अपीलकर्ता यांनी जो अर्ज केलेला आहे तो मुख्याध्यापिका निराला कॉन्वेंट यांचेकडे केलेला आहे व शाळेची माहिती मागितलेली आहे. मुख्याध्यापिका यांनी दि. 10.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना निराला कॉन्वेंटच्या लेटर हेड वर उत्तर दिलेले आहे. यावरुन केलेला अर्ज योग्य आहे. तो सार्वजनिक व्यापक हित काहीही नसल्यामुळे व अपीलकर्ता यांना अफरातफरीच्या कारणास्तव निलंबित केलेले असल्यामुळे, संस्थेस वेठीस धरण्याच्या दृष्टीने मुख्याध्यापिका यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा वापर करणे गैरवापर करुन माहिती मागितल्याची आयोगाची खात्री पटली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.780-781

जा.क्र.——————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 918/2010

श्री मिलींद भैय्यालाल रामटेके
विक्तु कृपा, कबड्डी ग्राऊन्ड जवळ
भिलगाव रोड, रनाळा जुनी वस्ती,
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती ता. कामठी जि. नागपूर
2) श्री व्ही. वाय. पाटील
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत रनाळा
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत रनाळा यांचेकडे दि.22.8.2009 व दि. 3.12.2009 या दोन अर्जावर कार्यवाहीची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.1.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.2.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दोन प्रति मध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगाकडे असे सांगितले की रनाळा येथील भुखंडाच्या संदर्भामध्ये मी स्वतः वारस असल्यामुळे त्या संदर्भामध्ये वारस नोंदणीच्या संदर्भात अर्ज केला होता व त्या अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीबाबत

माहिती मागितलेली होती. ती त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 13.1.2010 रोजी विहित मुदतीत त्यांच्या अर्जाप्रमाणे फेरफार करण्यात आलेला नाही त्या संदर्भातील ग्रामपंचायतच्या ठरावाची प्रत व मुद्या क्र. 3 च्या संदर्भातील माहिती दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मी वारसदार असल्यामुळे त्यांनी तसे करु नये अशी त्यांची अपेक्षा आहे व त्याकरीता त्यांनी प्रथम अपीलामध्ये काही प्रश्न विचारलेले आहे. माहितीच्या अधिकारामध्ये कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध होते. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे मत विचारता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.782-783

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 915/2010**

श्री चित्रशेखर ज्ञानोदय गावंडे
द्वारा श्रीमती निळाबाई गावंडे यांचे घरी
एकोरी वार्ड, एकोरी मंदीराच्या मागे, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर 442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुदद्येशिस विकास बॅंक लि.,
शिखर बॅंक, मुंबई,
15 ए मोरवी लेन, चौपाटी, मुंबई 400007
2) श्री व्ही. आर. भालेराव
जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुदद्येशिस विकास बॅंक लि.,
शिखर बॅंक, मुंबई
15 ए मोरवी लेन, चौपाटी, मुंबई 400007 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुदद्येशिस विकास बॅंक लि., शिखर बॅंक, मुंबई यांचेकडे एकुण सात मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.1.2010 च्या पत्रान्वये मुद्या क्र. 1,2,4,5,6 ची एकुण 11 पृष्ठे माहिती पाठविण्यात आलेली दिसून येते. व मुद्या क्र. 4 व 5 च्या संदर्भातील माहिती आर्थिक व्यवहाराशी निगडीत तसेच धोरणात्मक आहे याबाबत मा. प्रशासक यांची मान्यता घेवून पुढील कारवाई करावी असे दि. 16.12.09 चे टिपण केलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 8.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.12.2009, दि. 8.1.2010 व दि. 2.1.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच त्यांना दि. 24.12.2009 रोजी माहिती करीता खर्चाचा भरणा करावा असेही कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 16.2.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक होते. परंतू ते दिलेले नसल्यामुळेच अपीलकर्ता यांना द्वितीय अपील दाखल करावे लागलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या

माहितीच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत प्रश्न उपस्थित केलेले दिसून येतात. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये आयोगास कारवाई करता येत नाही. तसेच माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते व तसेही आयोगापुढे माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केल्यावर माहिती अधिकारी यांनी मुदतीत तसेच कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती पुरविलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. व त्यापुढे मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. 5666/2007 मध्ये डॉ. पंजाबराव अर्बन को.ऑप. बॅंक लि. राज्य माहिती आयोगाकडे याच प्रकरणी सहकारी बॅंका हया माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या 2 (च) नुसार सार्वजनिक प्राधिकरण यांच्या व्याख्येत येत नाही सबब सदरचा कायदा सहकारी बॅंकेस लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे राज्य माहिती आयुक्त खंडपीठ अमरावती यांनी सुध्दा दि. 10. 3.2010 रोजी श्री सांबारे विरुध्द यवतमाळ जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुविकास बॅंक मर्या. यांचे प्रकरणी संबंधित बॅंक सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने अपील क्र. 1914/2009 खारीज केल्याच्या निर्णयाची प्रत दाखल करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुविकास बॅंकेस लागू होत नाही व त्यामुळे अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.786-787

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 919/2010**

श्री पी. एम. पद्मावार
बी 1/202, शिवराया सोसायटी, समृध्दी संकूल
सिव्हील लाईन अमरावती रोड
नागपूर – 1 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री भांडे
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1, सदर, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.7.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 31.7.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक – 1 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. बी टाईप निवासस्थानासाठी प्रतिक्षा यादीवर असलेल्या कर्मचा–यांची नावे वर्षनिहाय
2. उपरोक्त प्रतिक्षा यादीतील कर्मचा–यांना निवासस्थान वाटप केले त्या आदेशाचे दिनांक व क्रमांक दर्शविणारा तक्ता
3. दरवर्षी मार्च अखेर वाटप न झालेली अ व बी टाईप मधील निवासस्थाने दर्शविणारा वर्षनिहाय तक्ता
4. श्री ब्राम्हणकर, श्री काळभोर उपजिल्हाधिकारी व श्री उमेश काळे यांना वाटप केलेल्या शासकीय निवासस्थानाचे क्रमांक, निवासस्थाने त्यांनी धारण केलेला कालावधी (वाटप आदेशाच्या प्रतीसह )

5. सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दि. 22.12.04 ची प्रत.
6. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 227 नुसारचे मागणीपत्र न पाठविल्याबद्यल कारवाई सादर झालेल्या टिपणीची प्रत.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 29.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलीय

अधिकारी हे कार्यकारी अभियंता असल्यामुळे सहा. अधिक्षक अभियंता यांनी अपील हे परत केलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 12.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतू प्रथम अपीलाचा निर्णयच दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांना दि. 12.5.2010 रोजी माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता यांनीच माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी योग्यरीत्या अधिक्षक अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. विभागात जर बदल झालेले होते तर ते बदल अर्जदार व इतरांच्या माहिती करीता प्रसिध्द करणे आवश्यक होते. व तसे ते केलेले नसल्यामुळे व विभागात सुध्दा त्याबाबतची जाणीव दिसून येत नसल्यामुळेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. ते सहा. अधिक्षक अभियंता यांनी परत करण्याची आवश्यकता नव्हती कारण माहिती अधिकारी हेच अपीलीय अधिकारी असू शकत नाहीत व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या दि. 29.5.2010 च्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी घेवून त्यांच्या दि. 12.4.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने निर्णय देणे आवश्यक राहिल. अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने दिली किंवा नाही व दिली आहे ती योग्य आहे किंवा नाही हे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये स्पष्ट झाल्यानंतर शास्तीचा विचार करण्यात येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अधिक्षक अभियंता यांनी सुनावणी घेवून निर्णय देण्याकरीता परत पाठविण्यात येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना पुन्हा द्वितीय अपील आयोगाकडे दाखल करण्याची परवानगी राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय अधिक्षक अभियंता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत करण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.781-782

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**